# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४

E-Mail : gug.registrar@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/ ५९५६/२०१८

दिनांक १९/०७/२०१८

## अधिसभा – सभासूचना

प्रति,

**सर्व सन्माननीय अधिसभा सदस्य,**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**विषय :–** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या **अधिसभेच्या विशेष सभेची सभा सुचना.**

**संदर्भ :– मा. कुलपती कार्यालयाचे पत्र क्र. CS/Gondwana/senate/2018/1132, दि. १८/७/२०१८.**

**मा. महोदय/महोदया,**

१) महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल आणि गोंडवाना विद्यापीठाचे कुलपती यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम २८ चे उपकलम (४) मधील तरतुदी अंतर्गत गोंडवाना विद्यापीठाच्या अधिसभेच्या विशेष सभेसाठी २३/०८/२०१८ ही तारीख निश्चित केली आहे. या तारखेला **अधिसभेची विशेष सभा दुपारी १२.०० वाजता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या सभागृहामध्ये** आयोजीत करण्याचे निर्धारीत करण्यात आले आहे. सदर सभेचे कामकाज दिं. २४/०८/२०१८ रोजी सुध्दा निंरतर राहू शकेल.

२) अधिसभेच्या कामकाजासाठी, निदेश क्र. २५/२०१८, दिं. १५/०७/२०१८ हा, मा. प्रभारी कुलगुरुंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ चे उपकलम (८) मधील त्यांना प्राप्त असलेला अधिकार वापरुन निर्गमित केला आहे.

३) अधिसभेच्या या **विशेष सभेमध्ये** खाली नमुद असलेल्या बाबींसंबधातच कार्यवाही घेण्यात येईल :–

**अ) निवडणुक :–** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम 30 (4) (f) अथवा ३० (४)(च), 30(4)(g) अथवा ३०(४)(छ), 30(4)(h) अथवा ३० (४)(ज) आणि 30(4)(i) अथवा ३० (४)(झ) मधील निवडणुकी संबधातील कार्यवाही घेण्यात येईल.

आणि

**ब) नामनिर्देशन :–** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम 32 (3) (h) अथवा ३२ (३)(ज), 70(3)(e) अथवा ७०(३)(ड.), 70(3)(f) अथवा ७०(३)(च), 70(3)(g) अथवा ७०(३)(छ), 79(3)(e) अथवा ७९(३)(ड.), 117 (2)(d) अथवा ११७ (२)(घ) मधील नामनिर्देशना संबधातील कार्यवाही घेण्यात येईल.

४) निदेश क्र. २५/२०१८ च्या परिच्छेद १८ मधील तरतुदी अंतर्गत अधिसभेच्या विशेष सभेची कार्यक्रमपत्रिका आपणास पाठविण्यात येईल.

आपणास विनंती आहे की, सदर सभेला उपस्थित राहून सहकार्य करावे.

आपला विश्वासू,

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
प्रभारी कुलसचिव तथा सदस्य सचिव